**Pradyumn Tijare**
**B. Tech. Electrical, SGGS, Nanded**



**आयुष्य म्हणजे शोधला तर अर्थ नाही तर नुसताच व्यर्थ**

गेल्या दहा महिन्याआधी मी एका हरवलेल्या पोरांसारखा होतो. म्हणजेच, एक सर्वसाधारण इंजिनिअरिंगच्या विद्यार्थासारखं सगळं सुरळीत चाललं होतं. ते दररोज कॉलेजला जाणे, कॉलेजची ते लेक्चर्स, मजा-मस्ती करणे आणि कॉलेज संपताच आपलं खोलीवर येवून मोबाईलवर तासंतास Social Media Scrolling, इंजिनिअर्सची अमर्यादित झोप आणि परिक्षेच्या एका हफ्ताआधी सगळं अभ्यास करून थोडे फार चांगले गुण घेणं असं सगळं चालू असायचं. Academics व्यतिरिक्त वाचन वगैरे तर अगदी 1% ही नव्हतं.

परंतु, या सर्वात स्वतःशीच एक स्वतःचं मनयुद्ध चालू असायचं की माझं अमुल्य आयुष्य म्हणजे केवळ एक आधीच millionaire असलेल्या बॉसला Billionaire बनवणे इतक्यापुरतंच मर्यादित आहेस का? खरं पाहता, मी कोण आहोत? माझ्या Life चं Purpose काय? माझ्या स्वतःच्या Values काय? असं मनात कुठंतरी चालू असायचं. पण या मनाच्या युद्धातून बाहेर निघण्याकरिता काय करावे कळतं नव्हतं.

त्यातच एकेदिवशी मंदार देशपांडे (निर्माण 4) याने कॉलेज मध्ये एक निर्माणबद्दल Session घेतलं. ते काय आहे? काय करतं? हे समजवणारं ते Session होतं. आणि ते मला एकदम भारी वाटलं. मग निर्माणची Website आणि YouTube Channel वरुन माहिती मिळवली, त्यांच्याबद्दल अधिक वाचलं आणि या सर्वाच्या मोहात पडलोत, मग दहाव्या बॅचसाठी फार्म भरलाय. Interview, Assignments केल्यात आणि शेवटी निर्माण 10 साठी Selection झालं. त्यानंतर काही कॉलेजचे मित्र बोललेत ते Brain Wash करतात असं वगैरे वगैरे. पण मात्र तेव्हा जरा गप्पच बसलो. आणि गांधीजीचं 'कर के देखो' एकलं आणि शोधग्रामला आलोत.

डिसेंबरची कडाक्याची थंडी असूनही शोधग्रामच्या निसर्गरम्य सौंदर्यतेने मनाला गोठू न देता ताजेतवाने केलंय. मग शिबीर चालू झालं. त्यातील सगळे IITs, AIIMS, IISER आणि बरेच चांगल्या ठिकाणहून आलेले मित्र, त्यांचे विचार, कुणी कुठे तरी चांगले काम करतंय किंवा करण्यासाठी प्रयत्न करतंय. या सर्वांना बघून गडचिरोलीतील आदिवासीला अमेरिकेत नेऊन टाकलं यासारखी माझी परिस्थिती होती. त्यामुळेच शिबिराचे

पहिले 4-5 दिवस जरा शांत शांत गेलेत. पण आजूबाजूला कायं चाललंय हे मात्र कळत होतं. नंतर शेवटच्या 2-3 दिवसात थोडे हिम्मत करुन बोललोत.

त्या आठ दिवसातील नायना (डॉ.अभय बंग), अम्मा (डॉ.राणी बंग) आणि निर्माण टीम यांच्या शिबिरादरम्यानची चर्चासत्रे तर अप्रतिमच होती. तसेच कडक थंडीत उर्जादायी श्रमदान, सर्व मित्रांच्या सोबतीला सकाळचा कडक चहा, रोमहर्षक गाणी, सायंकाळीची प्रार्थना आणि दिवसभर सकाळी ८ ते रात्री ९ वाजेपर्यंत चालणारी शिबीरातील विविध उपक्रमे,चर्चासत्रे,इत्यादी सगळं भारीच होतं. आणि या सर्वाचा जराही ताण न जाणवता रात्रीच्या शेकोटीवरील रात्रीची ३ वाजेपर्यतची थंडीतील गरम अशी चर्चासत्रे तर वेगळीच. मजा, मस्तीसोबतच जीवन-शिक्षण हा सगळा एक भन्नाट अनुभव होता आणि या सर्वामधून आयुष्यातील बरेचशा गोष्टीसाठीच्या नवीन व्याख्या आणि बरंच काही शिकलोत. या प्रवासात जीवाला जीव लावणारी, दुसऱ्याच्या मदतीला उत्तुंग मनाने उत्सुक असलेले, खरंच Dedication म्हणजे नेमकं काय? हे स्वतःच्या वागणुकीतून, त्यांच्या कामातून दाखवणारी अनेक साथीदेखील भेटलेत. स्वतःच्या ध्येय प्राप्तीसाठी अहोरात्र झटणारे, अगदी प्रत्येकाकडून काही ना काही शिकण्यासारखं आहे असे अनेक मित्रं मिळालेत...!

आणि शेवटी आठ दिवसाच्या अविस्मरणीय आठवणींसह परतीची वाट पकडलीत.

तिथून आल्यानंतर या आठ महिण्यात जवळ जवळ 13-15 पुस्तके वाचलीत. यादरम्यानच जॉर्ज ओरवेल, युवाह नोआ हरारी पासून तर व्हिक्टर फ्रान्केल अशा जगप्रसिद्ध लेखकांच्या साहित्याच्या सानिध्यात खेळलोत. यादरम्यान निर्माण टीमनेही Assignments, weekly meet-ups वगैरे यातून भरपूर शिकलोत आणि स्वतःला आणखी भक्कम आणि Develop करण्याचा प्रवास सुरू झालाय.

आणि हो आज मी गप्प न राहता त्या आधीच्या मित्रांना उत्तर देवू शकतो की Brain Wash वगैरे माहिती नाही पण मला माझा Brain Paint होतांना नक्कीच दिसतोय, आणि त्यांना आणखी एक सांगील की,

एकदिन मंजील तोह मिल ही जाएगी यूही भटकते भटकते,<br>गुमराह तोह वह है जो घरसे कभी निकले ही नही।

बरं... हा तर सर्व प्रवास होता. पण खूप लोकांना प्रश्न असेल की हे निर्माण निर्माण नेमकं आहे तरी काय ?

तर मी दहावीत असतांना मला एक वि.स.खांडेकर लिखित मराठीमध्ये एक धडा होता 'कस्तुरीमृग'. कस्तुरीमृग हा एक प्राणी असतो ज्याच्या नाबीमध्ये एक अत्यंत मनमोहक सुगंध असलेली कस्तुरी असते. पण त्याला त्याची जाणीव नसते, त्याला येतो तो नुसताच सुगंध आणि तो त्या सुगंधाच्याच शोधात असतो. तो त्या शोधात जसा जसा समोर धावतो तसा तसा तो सुगंधही त्याच्या सोबत सोबतच आणखी समोर जातोय आणि शेवटी धाव धाव धावून थकून तो मरतोय.

तर यावरून सांगायचे हेच की, तो जो कस्तुरीमृग आहे तो म्हणजे आजचा युवा आणि आजचा युवा ज्याप्रमाणे पैसा, materialistic life यांच्या अंधूक अशा क्षणिक सुंगधामागे धावतोय. पण शेवटी त्यांच्या आयुष्यात एवढं असं काही मिळत नाहीत आणि एक वेळ अशी येते की आपलं अमुल्य असं आयुष्य निघून जातं. खरं तर त्या युवाजवळीही कस्तुरीच आहेत. तर ती कस्तुरी कसली? तर त्याच्या Values, Strengths, Meaning of life, Purpose of life यांची ती कस्तुरी. पण त्यालाही ती कस्तुरी कस्तुरीमृगप्रमाणेच आपल्या जवळच आहेत या गोष्टींची जाणीव नसते आणि नुसताच तो आयुष्यात पळत असतो. आणि शेवटी हाती काहीच लागत नाहीत. पण या सर्वात महत्त्वाचं एकच की कस्तुरीमृगाला गरज आहे ती या जीवनाचा उद्देश, हेतू माहित न करता सैरभैर

धावण्याच्या स्पर्धेला कुठेतरी ब्रेक मारण्याची आणि आपल्या स्वतःच्या Values, Strengths, Purpose of life, Meaning of life या कस्तुरीचा शोध घेण्याची आणि त्याला अनुसरून आपलं career बनविण्याची...

मला वाटतं याचं कस्तुरीचा शोध लावण्यासाठीच मदत करण्याचं काम करतं निर्माण... आणि त्याच्या उपयोग करून मी माझं आयुष्य अधिक अर्थपूर्ण कसं करु हे शिकवतं निर्माण...

मी आता जेव्हा माझ्या आयुष्यातील काही वर्षे भुतकाळात जावून विचार करतो तर मी स्वतः जसा होतो आणि आता स्वतःबद्दल जसा विचार करतोय त्यावरून वि. दा. करंदीकर यांची एक काव्यपंक्ती डोळ्यासमोर उभी राहतेस,

चुकले न ध्येय तरी, हुकले न श्रेय सारे,
या वेढ्या मुसाफिराला सामील सर्व तारे...

तर ज्यांना कुणाला वाटतं आपल्यालाही अधिक अर्थपूर्ण आयुष्याची वाट हवीय त्यांनी खालील websites ला अवश्य भेट द्या.

निर्माणची अकरावी बॅच येत्या वर्षात "सर्च,गडचिरोली" येथे सुरू होत आहे. यामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी http://nirman.mkcl.org या संकेत स्थळावरून प्रवेश अर्ज डाऊनलोड करावा आणि भरून त्वरित पाठवू शकता.